email.doc

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आय्एस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**
**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**

संदर्भः- (१) सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाची पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश माहिती पुस्तिका.
(२) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्रमांक मफुकृवि-२०१० / प्र.क्र.८/७ अे, दि.१६/६/२०१०.

-----------------------------

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/११०/१६९० दि. ३ जुलै,२०१०

## शुध्दिपत्र

मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत खालील सहा महाविद्यालयांची प्रवेश क्षमता सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आली आहे. मात्र संदर्भ क्र.२ येथील दि. १६ जून,२०१० च्या शासन निर्णयान्वये सदर महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढविण्यात आली आहे. महाविद्यालयनिहाय सुधारीत प्रवेश क्षमतेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | घटक महाविद्यालयाचे नाव | सध्याची प्रवेश क्षमता | वाढीव प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | कृषी महाविद्यालय, अंबाजोगाई | ३२ | ६० |
| २. | कृषी महाविद्यालय, बदनापूर | ३२ | ६० |
| ३. | कृषी महाविद्यालय, उस्मानाबाद | ३२ | ६० |
| ४. | कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर | ३२ | ४० |
| ५. | गृहविज्ञान महाविद्यालय, परभणी | ३२ | ४० |
| ६. | उद्यानविद्या महाविद्यालय, परभणी | ३२ | ४० |
| | **एकूण** | **१९२** | **३००** |

सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश अर्ज सादर करणा-या सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, उक्त महाविद्यालयांची वाढीव प्रवेश क्षमता विचारात घेता उमेदवारांना आपल्या विकल्पांमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी त्यांच्या 'आयडी' व 'पासवर्ड'च्या आधारे दि. ७ जुलै,२०१० पर्यंत विकल्पामध्ये बदल करावा.

स्वाक्षरीत/-
**(गणेश ठाकूर)**
महासंचालक
कृषी परिषद, पुणे

प्रति,
सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार.

प्रतः- (१) डॉ. ए. पी. वाडेगावकर, व्यवस्थापक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, आयसीसी ट्रेड टॉवर, अे विंग, ५ वा मजला, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
२/- त्यांना सूचित करण्यात येते की, सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना एस्एम्एस्द्वारे अवगत करण्यात यावे. तसेच सदरचे शुध्दिपत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
(२) मे. विन्टेक सोल्युशन्स, ऑफीस क्र.१०, मयुर नगरी, नवी सांगवी, पुणे-२७
२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उक्त शुध्दिपत्र उपलब्ध करून देण्यात यावे.